महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - ६९४२५१४१

क्र. मासंवि/रवका/न.क्र.२८३/ **०२१८८** दिनांक: **२१.०१.२०२५**

प्रति,
सर्व मुख्य अभियंता
परिमंडल कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.मर्या.

**विषय**: सा.आ.७४(क) दि.३०.०४.१९७४ व सा.आ.१११(क) दि.१३.०५.१९७२ नुसार उच्चवेतनश्रेणीचे लाभ मंजूर करावयाच्या कार्यपध्दतीबाबत.

----

सामान्य आदेश क्र.७४(क) दि.३०.०४.१९७४ व सामान्य आदेश क्र.१११(क) दि.१३.०५.१९७२ चे लाभ मंजूर करीता असतांना बदली झालेल्या कर्मचाऱ्याचा बदली पूर्वी देय असलेला लाभ कोणत्या कार्यालयाने मंजूर करावा याबाबत क्षेत्रिय कार्यालयांमध्ये संदिग्धता निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

२. याबाबत सक्षम अधिकारी यांच्या मंजूरीनुसार कळविण्यात येते की, अशा प्रकरणी खालील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

एक) कर्मचाऱ्याच्या बदली/ पदोन्नती/ सेवाप्रवेश इत्यादी नंतर सेवापुस्तक पाठवतांना सर्व नोंदी करूनच सेवापुस्तके पाठवावीत.

दोन) बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे बदली पूर्वीचे उच्च वेतनश्रेणी लाभाचे प्रस्ताव त्यांच्या सध्याच्या विभागीय/ मंडल/ परिमंडल/ प्रादेशिक/ मुख्य कार्यालयाने प्रशासकीय परिपत्रक क्र.६८४ दि.०६.११.२०२४ अन्वये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार SAP प्रणालीव्दारे मंजूर करावेत.

तीन) वरीलप्रमाणे उच्च वेतनश्रेणी लाभाचे प्रस्ताव मंजूर करीत असतांना तो कर्मचारी सध्या ज्या कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत आहे त्या कार्यक्षेत्रातील सक्षम अधिकारी यांच्या कार्यालयाने सेवापुस्तकातील नोंदी तपासून मंजूर करावेत.

३. सबब, उपरोक्त सूचनांनुसार आपल्या कार्यक्षेत्रातील पात्र कर्मचाऱ्यांचे उच्च वेतन श्रेणीचे लाभ विहीत कालावधीत प्रणालीमार्फत निकाली काढण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

**प्रत रवाना:**

महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.